**Region:** Indian Subcontinent
**Country:** India
**Publication: Loksatta**
**Editions: Pune**
**Date: 14th October 2011**
**Title of article: Garware Motors launches Super bike**
**Category**: Direct Coverage

---






**क्लास ते मास संक्रमण**

## गरवारे मोटर्सकडून ४.६० लाखांची 'सुपरबाईक'!

व्यापार प्रतिनिधी

सहा महिन्यापूर्वीच सुपर बाईक विक्री क्षेत्रात उतरणाऱ्या पुणेस्थित गरवारे मोटर्सने आता कमी इंजिन क्षमतेच्या मोटारसायकल बनविण्याचा निर्णय घेतली आहे. कंपनी सध्या कोरियाच्या ह्योसन्ग या उच्च क्षमतेच्या स्पोर्टबाईकची देशभरात विपणन आणि विक्री करते. कंपनी आता २५० तसेच १२५ सीसी क्षमतेच्या दुचाकीही तयार करणार आहे.

कोरियाच्या एस अँण्ड टी मोटर्सचा ह्योसन्ग हा ब्रॅन्ड गरवारे मोटर्समार्फत भारतात एप्रिल २०११ मध्ये नावारूपास आला. कंपनीने यावेळी ६५० आणि ७०० सीसी क्षमतेच्या दोन सुपरबाईक सादर केल्या होत्या. गेल्या सहा महिन्यात त्यांची ३२५ विक्री झाली आहे. सुपरबाईकची भारतीय बाजारपेठ ही २,००० कोटी रुपयांची असून वार्षिक ३० ते ४० टक्क्यांनी ती विस्तारणारी आहे. ह्योसंगच्या नव्या बाईकची किंमत ४.६० लाख रुपये (एक्स शोरुम, मुंबई) आहे. काळा, पांढरा आणि लाल अशा तीन रंगात ती उपलब्ध आहे. सध्या तीन व्हर्जनमध्येच या नव्या बाईक असतील. ■

## 'अल्टो'च्या स्पर्धेत ह्युंदाईची स्वस्त-मस्त 'इऑन'!

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

गेल्या काही महिन्यांपासून कामगारांच्या संपाचा फटका सहन करणाऱ्या मारुती सुझुकीच्या लोकप्रिय अल्टोच्या स्पर्धेत कोरियन कंपनी ह्युंदाईने आज आपली बहुप्रतिक्षित इऑन ही प्रवासी कार सादर केली. ८१४ सीसी इंजिन क्षमता असलेल्या इऑनची किंमत २.६९ ते ३.७१ लाख (एक्स-शोरुम, नवी दिल्ली) रुपयांदरम्यान आहे.

लहान कार क्षेत्रात मारुती ८०० नंतर अल्टोचा क्रमांक लागतो. मारुतीच्या अल्टोसह इतर कारनिर्मितीवर कामगारांच्या संपाचा परिणाम होत आहे. असे असतानाच ह्युंदाईने आज अल्टोच्या २.३२ ते ३.१७ लाख रुपयांच्या तुलनेत स्वस्त अशी इऑन ही कार बाजारात आणली आहे. दिवाळी काही दिवसांवर असतानाच इऑनसाठी गेल्या काही दिवसांपासून कंपनीची जोरदार प्रचार मोहीम सुरू होती.

इऑनच्या प्रस्तुतीबरोबरच छोट्या कारच्या निर्मितीत कंपनीचे अस्तित्व यापुढे अधिक विस्तारत जाईल, असे ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ एच. डब्ल्यू. पार्क यांनी सांगितले. इऑनच्या निर्मितीकरिता कंपनीने ९०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून वार्षिक दीड लाख कारनिर्मिती कंपनी करेल. ■

## गरवारेचा वाई येथे नवीन उत्पादन प्रकल्प

व्यापार प्रतिनिधी

आज नवी जीटी ६५० एन ही सुपरबाईक सादर करतानाच कंपनी कमी क्षमतेच्या बाईकची निर्मितीही लवकरच करेल, अशी घोषणा गरवारे मोटर्सच्या व्यवस्थापकीय संचालक दिया गरवारे यांनी दिली. कमी क्षमतेच्या बाईकच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रातील वाई येथे २२ एकर जागेवर २५ कोटी रुपये गुंतवणुकीचा प्रकल्प साकारत असून येथून २५० सीसी क्षमतेची बाईक चालू आर्थिक वर्षअखेरपर्यंत तयार केली जाईल, असे गरवारे मोटर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी हैदर अली खान यांनी सांगितले. गरवारे मोटर्सच्या विक्री दालनांची संख्याही या दरम्यान सध्याच्या १४ वरून ५० वर नेली जाणार आहे; कंपनीची वाहन जुळवणी/निर्मिती क्षमताही प्रती दिन आठवरून ३० पर्यंत जाणार असल्याचेही ते म्हणाले. कंपनीच्या सध्याच्या ३५ कर्मचाऱ्यांची संख्याही नव्या विस्तारात वाढविली जाईल, असेही त्यांनी सांगितले. ■